जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in



# -: प्रेस नोट:-

दिनांक ०२/०६/२०२६

## " जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची (LCB) धडक कारवाई; चोपड्यात गावठीकट्टा, मॅगझिनसह आंतरजिल्हा टोळी जेरबंद ०६ लाखांचा मुद्देमाल जप्त "

===०००===

**मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगांव तसेच मा. श्री. सुनिल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव स्थानिक गुन्हे शाखा (LCB) व चोपडा शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त पथकाने बेकायदेशीर शस्त्रास्त्रांची वाहतूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीवर धडक कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत एक गावठी कट्टा (पिस्तूल), दोन मॅगझिन, तीन मोबाईल फोन व एक कार असा एकूण ६,००,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक ०१/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, काही इसम एका कारमधून विनापरवाना गावठी कट्टा घेऊन लासूर-चुंचाळे मार्गे चोपडा शहराकडे येत आहेत. माहितीची खात्री करून स्थानिक गुन्हे शाखा तसेच चोपडा शहर पोलीस स्टेशनचे अधिकारी/अमंलदार यांचे संयुक्त पथक तयार केले.

तयार करण्यात आलेल्या पथकाने चोपडा-लासूर-चुंचाळे रोडवरील शनिमंदिर परिसरात सापळा रचला. सायंकाळी सुमारे ७:३० वाजता संशयित Hyundai EON (MH २० EE-६१०३ कार अडवून पंचांसमक्ष झडती घेतली असता कारच्या मागील सीटखाली एक गावठी कट्टा (पिस्तूल) मॅग्झीनसह व एक अतिरिक्त मॅगझिन आढळून आले. तसेच आरोपींच्या अंगझडतीत तीन मोबाईल फोन मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**अटक करण्यात आलेले आरोपी :-**

**१. ज्ञानेश्वर रामकृष्ण माळी वय ३९ वर्षे, रा. कुऱ्हाड खुर्द, ता. पाचोरा, जि. जळगाव**
**२. सचिन रोशन पवार वय ३४ वर्षे, रा. मयूर पार्क कॉलनी, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर**
**३. अनिल कचरे साळुंखे वय ३७ वर्षे, रा. जाधव गल्ली, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर**

**जप्त मुद्देमाल :-**

**१. ६०,०००/- रु किंतीचे गावठी कट्टा (पिस्तूल) व मॅगझिन**
**२. १०,०००/- रु किंमतीचे अतिरिक्त मॅगझिन**
**३. ५,००,०००/- रु किंमतीची Hyundai EON कार**
**४. ३०,०००/- रु किंमतीचे Oppo, Vivo व Redmi कंपनीचे एकुण ०३ मोबाईल फोन**

---

**एकूण ६,००,०००/- लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल**

**याप्रकरणी चोपडा शहर पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्र. २८५/२०२६ भारतीय हत्यार कायदा (Arms Act) कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चोपडा शहर पोलीस करीत आहेत.**

सदरची कारवाई कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा. श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगांव, तसेच मा. श्री. सुनिल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड, चोपडा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. पवन देसले यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरी/जितेंद्र वल्टे, पोहेकॉ/दिपक माळी, पोहेकॉ. रविंद्र पाटील, पोहेकॉ/विष्णु बिऱ्हाडे, पोकॉ/रावसाहेब पाटील तसेच चोपडा शहर पोलीस स्टेशनचे सपोनि/एकनाथ भिसे, सपोनि/युवराज वाळुंज, पोकॉ./राजेंद्र कोळी, पोकॉ/योगेश पाटील व पोकॉ/रजनीकांत भास्कर, पोकॉ/समा तडवी या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

*"सदरची कारवाई जळगाव पोलीस दलाच्या बेकायदेशीर शस्त्रास्त्रांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या मोहिमेतील आणखी एक महत्त्वपूर्ण यश असून अशा प्रकारच्या अवैध कृत्यांविरुद्‌ध कठोर कारवाई यापुढेही सुरू राहणार आहे."*

******************************************************************************


SPORT